# <u>रे. दिवाणी मुकदमा नं.१४/२०१५ मधील नि.६५ वरील आदेश</u>

**(युनुस अब्दुल लांडगे वगैरे वि. कमालनसीर अब्दुल लांडगे वगैरे)**

(**CNR:MHSN**12000118-2015)

१. वादी यांनी प्रतिवादी क्र.२ चे वारसांना रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

प्रस्तुत दाव्यामधील प्रतिवादी क्र.२ बनुबी अब्दुल लांडगे ह्या दिनांक ०६/०५/२०१८ रोजी मयत झाल्या आहेत. सदर प्रतिवादी नं. २ यांचे वारस रेकॉर्डवर आणणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी नं.२ यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

**प्रतिवादी क्र.२ श्रीमती बनुबी अब्दुल लांडगे (मयत वारस)**

वादी नं. १ श्री. युनुस अब्दुल लांडगे
वय ४५ वर्षे, धंदा शेती व व्यापार,
वादी नं. २ श्री. सलीम अब्दुल लांडगे
वय ५६ वर्षे, धंदा – शेती व व्यापार
प्रतिवादी नं. १ श्री. कमालनसीर अब्दुल लांडगे
वय ५८ वर्षे, धंदा – शेती
प्रतिवादी नं. ३ कनिज अब्दुल लांडगे
वय ५० वर्षे, धंदा – नोकरी
सर्व रा. रामानंदनगर, ता. पलूस, जि. सांगली

३. सबब वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांना वारस असून त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. सदरचे वारस या दाव्याचे कामी सामील आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा रेकॉर्डवर घेणेची आवश्यकता नाही. सदरचा वारस अर्ज देण्यास विलंब झालेला आहे. सबब याकामी सदरचा विलंब माफ होवून प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर आणणेस वादी यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी म्हणणे दाखल केले नाही. सबब त्यांचेविरुध्द प्रस्तुत अर्ज विना म्हणणे आदेश करणेत आला.

५. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कोणत्याही दाव्याचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी व दाव्याचे वर्णन अचुक असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दाव्यातील दुरुस्ती पाहता वादीतर्फे प्रतिवादी क्र.२ चे वारस दाव्याचे कामी सामील करणेस परवानगी मागितली आहे. सदर मयत प्रतिवादी क्र.२ यांचा मृत्युचा दाखला वादीतर्फे नि.६८/१ वर दाखल केलेला आहे. त्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ यांचा मृत्यू दि.०६/०५/२०१८ रोजी झालेला आहे. वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदीनुसार वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये अशा प्रकारे दुरुस्ती मंजूर केली असता त्यामुळे दाव्याचे निराकरण होण्यास मदतच होणार आहे. सदरची दुरुस्ती केल्यामुळे मुळ दाव्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती जर नामंजूर केली तर वादी यांचे कधीही पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरची दुरुस्ती जर मंजूर केली तर प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्यामुळे वादीतर्फे कथनाचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींचा नि.६५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत नि.६५ चे अर्जात सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

३. वादी यांनी सदरची दावा दुरुस्ती करुन सदरची दावा दुरुस्त प्रत मे. कोर्टासाठी व प्रतिवादींसाठी पुढील तारखेस हजर करावी.

IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN

Digitally signed by IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2022.12.16 10:58:09 +05'30'

**पलूस** **( आय. ए. वाय. ए. खान )**

**दिनांक–१४/१२/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 14/12/2022 |
| Signed by P. O. on | : | 14/12/2022 |
| Uploaded on | : | 16/12/2022 |